GR-200407291229270001

# खाजगी शिकवणी करणाऱ्या शिक्षकांविरुद्ध कारवाई करण्याबाबत

**क्रमांक :- एसएसएन १०००/(१००/२०००)/माशि-२**
**दिनांक :- २६.४.२०००**

प्रति, (१) शिक्षण संचालक,
(२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,

खाजगी शिकवणी वर्गास प्रतिबंध व्हावा म्हणून शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली विभागीय समित्या शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. युबीजी १७९८/८४/९८/विशि-३, दि. २२ जुलै, १९९८ अन्वये नियुक्त करण्यात आल्या आहेत.

२. माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच महाविद्यालयीन शिक्षक खाजगी शिकवणी वर्गास शिकवित असल्याच्या तपशीलासह तक्रारी असल्यास, तक्रारीत उल्लेख केलेल्या खाजगी शिकवणी वर्गांना संबंधित विभागातील समिती सदस्यांनी भेट देण्याची तरतूद आहे.

३. महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मधील कलम ४ (५) तसेच महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम २३ मधील तरतुदींनुसार माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना खाजगी शिकवणी वर्गामध्ये शिकविण्यास बंदी घालण्यात आलेली आहे. खाजगी शिकवणी वर्गास भेट दिल्यानंतर सदर तरतुदींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित शिक्षकाच्या वेतनावरील अनुदान रोखून ठेवण्याची कार्यवाही विभागीय शिक्षण उपसंचालकांनी करावयाची आहे. तसेच याविषयीची माहिती शिकवणी वर्गाच्या संचालकास तसेच तेथील व्यवस्थापकीय वर्गास समितीकडून तात्काळ देण्याची तरतूद आहे. संबंधित शिक्षकांनी सेवाशर्तींचा भंग केल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही देखील प्रस्तावित करण्याची तरतूद आहे. तसेच जोपर्यंत संबंधित दोषी शिक्षक क्षतीबंध पत्रावर लिहून देत नाही, तोपर्यंत त्याचे वेतन रोखण्यात यावे, या दोषी शिक्षकांविरुद्ध शिस्तभंग विषयक कार्यवाही संबंधित व्यवस्थापनाने करावी, ठराविक मुदतीत व्यवस्थापनाने कार्यवाही केली नाही तर त्या व्यवस्थापनाविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचनाही वरील शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत.

४. दिनांक १९ एप्रिल, २००० रोजी महाराष्ट्र विधान परिषद नियम २६० अन्वये अनियतदिन प्रस्तावावर चर्चा होत असताना मा. मंत्री, शालेय शिक्षण यांनी खालीलप्रमाणे आश्वासन दिले आहे :-
"खाजगी शिकवणी करणाऱ्या शिक्षकांविरुद्ध तक्रार प्राप्त झाल्यानंतर कडक कारवाई करण्यास संस्थेस बांधील ठेवण्यात येईल."

५. उपरोक्त आश्वासन पूर्तीच्या संदर्भात वरील सर्व नियमांचा आधार घेऊन सर्व शिक्षणाधिकारी व सर्व संस्थांचे व्यवस्थापनास आवश्यक त्या सूचना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती शासनास सादर करावी.

**ज. मो. अभ्यंकर**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

एच-514 (300-7-00) ।